आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१४ डिसेंबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- ऊर्जेची बचत करणं हाच ऊर्जेचा सर्वात पर्यावरणस्नेही आणि विश्वसनीय स्रोत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन /राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कारांचं केलं वितरण

- भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नितीन नबीन यांची नियुक्ती

- महाराष्ट्र विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून मुंबईत

- लोकप्रिय फूटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या हस्ते मुंबईत प्रोजेक्ट महादेवचा प्रारंभ

**आणि**

- स्क्वॉश विश्वचषक स्पर्धेत अग्रमानांकित हाँगकाँगला नमवत भारताची विजेतेपदाला गवसणी

**<><><><><>**

ऊर्जेची बचत करणं हाच ऊर्जेचा सर्वात पर्यावरणस्नेही आणि विश्वसनीय स्रोत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिनी केलं. या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कारानं राष्ट्रपतींनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात सन्मानित केलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. जगातल्या सर्वाधिक वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी भारत एक असून विकासाच्या या यात्रेत ऊर्जेची गरजही वेगानं वाढत असल्याचं राष्ट्रपतींनी सांगितलं आणि ऊर्जा बचतीचं महत्त्व अधोरेखित केलं.

- ***- होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू - -***

ऊर्जेची बचत, नवीकरणीय ऊर्जास्रोतांचा वापर यामुळे कार्बन उत्सर्जन कमी करायलाही हातभार लागतो, ही बाब राष्ट्रपतींनी अधोरेखित केली. ऊर्जा संरक्षण आणि स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी भारत सरकारनं केलेल्या उपाययोजनांचा त्यांनी उल्लेख केला आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातलं उद्दिष्ट  वेळेआधीच पूर्ण केल्याचं त्या म्हणाल्या. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल, ऊर्जा आणि नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नितीन नबीन यांची नेमणूक झाली आहे. भाजपाच्या संसदीय मंडळानं ही नियुक्ती केल्याचं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंग यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. नितीन नबीन सध्या बिहार मंत्रिमंडळात मंत्री असून ते जे पी नड्डा यांच्याकडून अध्यक्षपदाचा कार्यभार घेतील. नड्डा यांचा कार्यकाळ जानेवारी २०२० मधेच संपला होता मात्र २०२४ मधल्या लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीनं त्यांना मुदतवाढ दिली होती.

नितीन नबिन हे मेहनती कार्यकर्ता असून त्यांना संघटनाचा समृद्ध अनुभव आहे असं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

उत्तर प्रदेश भाजपाच्या अध्यक्षपदी केंद्रीय राज्य मंत्री पंकज चौधरी यांची नियुक्ती झाली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचं आज सूप वाजलं. या अधिवेशनात विधानसभेत एकंदर १८ विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली आणि त्यातली १६ मंजूर झाली, तर विधानपरिषदेत ४ विधेयकं संमत झाली. विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६पासून मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं घालून दिलेल्या मर्यादेच्या आतच राज्य सरकारनं कर्ज घेतलं असून राजकोषीय तूट तीन टक्क्यांच्या आत ठेवण्यात यश आलं असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आज शेवटच्या दिवशी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला त्यांनी उत्तर दिलं. चालू आर्थिक वर्षातही राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या आत ठेवण्यात यश येईल असा विश्वास व्यक्त करत, राज्य दिवाळखोरीकडे जात नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री- -**

२०२९-३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. रचनात्मक कार्यातून राज्याचा विकास साधायचा आहे, यासाठी

सत्ताधारी आणि विरोधक दोघांनी मिळून प्रयत्न करायला हवेत, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

या अधिवेशनात जनतेच्या कल्याणासाठी कुठलाही निर्णय घेतला गेला नसून केवळ आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अधिवेशन घेतल्याची टीका विरोधी पक्षाच्या नेत्यांनी नागपूरमधे वार्ताहर परिषदेत केली. कुपोषण, भ्रष्टाचार, अमली पदार्थाची विक्री याबद्दलच्या कुठल्याही प्रश्नाला सरकारनं उत्तर दिलं नाही, या अधिवेशनातून विदर्भाच्या वाट्याला काहीही आलं नसून घाईगडबडीत अधिवेशन गुंडाळल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

तर, विरोधी पक्षांनी अधिवेशन चालवण्यासाठी सरकारला संपूर्ण सहकार्य केलं, मात्र एकाही मंत्र्यानं अधिवेशन गांभीर्याने घेतलं नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी केली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उद्यापासून दोन दिवस जॉर्डनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भारत आणि जॉर्डन यांच्यातल्या राजनैतिक संबंधांचं हे ७५वं वर्ष आहे. जॉर्डनकडून मिळणाऱ्या फॉस्फेटपासून भारतातल्या कृषी क्षेत्राला मिळणारी ऊर्जा, तसंच दोन्ही देशांमधले जवळचे सांस्कृतिक धागे यांच्या आधारावर दोन्ही देशांमधले संबंध आणखी बळकट होत आहेत. प्रधानमंत्री मोदी यांचा जॉर्डन दौरा म्हणजे व्यापार, अन्नसुरक्षा आणि दोन्ही देशांच्या नागरिकांमधल्या संबंधांसाठी एक मैलाचा दगड असल्याचं जॉर्डनमधले भारताचे राजदूत मनीष चौहान यांनी म्हटलं आहे. जॉर्डनचा दौरा आटोपून प्रधानमंत्री १६ आणि १७ डिसेंबर रोजी इथियोपियाला भेट देतील, त्यानंतर १७ आणि १८ तारखेला ते ओमानला जाणार आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या १३ वर्षांखालच्या फुटबॉल खेळाडूंना जागतिक दर्जाचं प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती मिळण्यासाठी सुरू केलेल्या प्रोजेक्ट महादेव या योजनेचा प्रारंभ आज लोकप्रिय फूटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या हस्ते झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस,

क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, अभिनेता टायगर श्रॉफ, अजय देवगण यांच्यासह अन्य मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते.

लिओनेल मेस्सी हा गोट इंडिया दौऱ्याच्या निमित्ताने आज मुंबई दौऱ्यावर आला. मुंबईत वानखेडे मैदानावर या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात सचिन तेंडुलकरनं त्याची १० क्रमांकांची जर्सी मेस्सी याला भेट दिली, तर मेस्सीनं सचिनला फुटबॉल भेट दिला. वानखेडे मैदानावर आपण अनेक ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार झालो आहोत, आणि मेस्सीची इथली उपस्थिती हाही एक ऐतिहासिक क्षण असल्याचं मनोगत सचिन तेंडुलकर यांनी व्यक्त केलं.

<><><><><>

चेन्नई इथे झालेल्या स्क्वॉश विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज भारताने हाँगकाँगचा पराभव करून प्रथमच स्क्वॉश विश्वचषक पटकावला. भारताने हाँगकाँगचा ३-०ने धुव्वा उडवला. जोशना चिनप्पाने ली का यीचा ३-१ असा पराभव करून भारताला विजयी सुरुवात करून दिली. अभय सिंग यानेही ॲलेक्स लाऊ याचा ३-० असा पराभव केला. तर अनाहत सिंगने टोमॅटो हो या खेळाडूचा ३-० असा पराभव करत सामना जिंकून दिला.

<><><><><>

१९ वर्षांखालच्या क्रिकेटमध्ये आशिया चषक स्पर्धेत आज दुबई इथं झालेल्या अ गटातल्या सामन्यात भारतानं पाकिस्तानला ९० धावांनी पराभूत केलं. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारतानं ४६ षटकं आणि एका चेंडूत २४० धावा केल्या. एरॉन जॉर्जनं सर्वाधिक ८५ धावा केल्या. कनिष्क चव्हाणनं ४३, तर कर्णधार आयुष म्हात्रेनं ३८ धावांचं योगदान दिलं.

भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ ४१ षटकं आणि २ चेंडूत १५० धावात गारद झाला. भारतातर्फे दीपेश देवेंद्रन आणि कनिष्क चव्हाण यांनी प्रत्येकी ३ तर किशन सिंगनं २ गडी बाद केले.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना आज धरमशाला इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १४ व्या षटकात ६ बाद ६९ धावा झाल्या होत्या.

पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियात सिडनी इथल्या बॉण्डी समुद्रकिनाऱ्यावर आज  संध्याकाळी झालेल्या गोळीबारात एका हल्लेखोरासह १२ जण ठार  झाले. तर आणखी एका हल्लेखोराला पोलिसांनी ताब्यात घेतलं. या हल्ल्यात  दोन पोलिस अधिकाऱ्यांसह २९ जण जखमी झाले आहेत. ही घटना  धक्कादायक आणि अत्यंत वेदनादायक असल्याचं ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँटोनी अल्बानीस यांनी म्हटलं आहे. गेल्या दोन वर्षात ऑस्ट्रेलियात निर्माण झालेल्या यहुदींविरोधी वातावरणाचा हा परिणाम असल्याचं मत  इस्रायलचे परराष्ट्र मंत्री गिडीयॉन  सार यांनी  व्यक्त केलं. **हनुक्का** या यहुदी सणाच्या पहिल्या दिवशीच तो साजरा करणाऱ्या नागरिकांवर हा हल्ला झाला.

प्रधानमंत्री **नरेंद्र मोदी** यांनी या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत  निषेध केला आहे. दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेची भारताची  भूमिका असून, सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्धच्या लढ्याला भारताचा पाठिंबा आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**//<><><><><>//**